भारताची ताकद वाढली! >>पान 2

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरी करूया : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 3

कारमधून एमडी ड्रग्ज तस्करी उघड; शिरपूर पोलिसांची मोठी कारवाई >>पान 4

**सुविचार**

आदर आणि चादर चुकीच्या लोकांना दिल्यास आपण उघडे पडतो!

दैनिक
# आपला विदर्भ

apalavidarbhlivenews@gmail.com

मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 235 ■ शनिवार, दि. 04 एप्रिल 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



ज्येष्ठ गायक अजित कडकडे यांना संगीत रत्न जीवन गौरव पुरस्कार देऊन केलं सन्मानित

आतील पान


# जन विश्वास विधेयक दोन्ही सभागृहात मंजूर

## वाहतूक कोंडी, ड्रायव्हिंग लायसन्सच्या नूतनीकरणात होणारा विलंब हे आता गुन्हे नाहीत

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

संसदेच्या दोन्ही सभागृहांनी जन विश्वास विधेयकाला मंजुरी दिली. राष्ट्रपतींची स्वाक्षरी झाली की अधिसूचना काढली जाईल आणि विधेयकाचे कायद्यात रुपांतर होईल. हे झाले की वाहतूक कोंडीला कारणीभूत ठरणे, जन्म आणि मृत्यूची नोंद करण्यात चुका करणे हे गुन्हे ठरणार नाही.

देशात जन विश्वास हा कायदा लागू झाला की होणाऱ्या बदलाचा लोकांच्या दैनंदिन जीवनावर थेट परिणाम होईल. आता, वाहन चालविण्याचा परवाना (ड्रायव्हिंग लायसन्स) मुदत संपल्यानंतर ३० दिवसांपर्यंत वैध राहील, म्हणजेच किरकोळ विलंबामुळे तुमच्यावर




फौजदारी गुन्हा दाखल होणार नाही. राष्ट्रीय महामार्ग अडवण्यासारख्या प्रकरणांमधील तुरुंगवासाची शिक्षा रद्द करण्यात आली असून, आता केवळ दंडाची तरतूद आहे. त्याचप्रमाणे, आगीच्या धोक्याची खोटी सूचना देणे, जन्म आणि मृत्यूची नोंद करण्यास विलंब करणे किंवा विद्युत नियमांचे उल्लंघन करणे यांसारख्या प्रकरणांमधील तुरुंगवासाची शिक्षा देखील काढून टाकण्यात आली आहे. पूर्वी सौंदर्यप्रसाधनांच्या नियमांचे उल्लंघन केल्यास तुरुंगवासाची शिक्षा होऊ शकत होती, पण आता केवळ दंड आकारला जाईल. याचा सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (श्एश्ए) क्षेत्राला फायदा होईल.

विश्वासावर आधारीत प्रशासकीय आराखड्याला चालना देणे आणि नियमनांमध्ये प्रमाणबद्धता असेल याची सुनिश्चिती करण्याबद्दलची केंद्र सरकारची वचनबद्धता यातून दिसून येते. किरकोळ गुन्ह्यांना गुन्हे सूचीतून वगळून तसेच विद्यमान कायदेशीर तरतुदीमध्ये तर्कसंगतता साधत, व्यक्ती तसेच उद्योग व्यवसायांवरील अनुपालनाचा ताण कमी करणे हा या विधेयकाचा उद्देश आहे. या विधेयकातील तरतुदींअंतर्गत ७९ केंद्रीय कायद्यांमधील ७८४ तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. व्यवसाय सुलभतेला चालना देण्यासाठी यांपैकी ७१७ तरतुदींना गुन्हे या वर्गातून वगळण्यात आले आहे. जीवन सुलभतेसाठी ६७ तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात आली आहे. या निमित्ताने केंद्र सरकारचा भर शिक्षेऐवजी सुधारणेकडे असल्याचे दिसून येत आहे. जन विश्वास विधेयकाचे राष्ट्रपतींच्या स्वाक्षरीने कायद्यात रुपांतर झाल्यानंतर सामान्य माणसाला दिलासा मिळेल आणि न्यायव्यवस्थेवरील अनावश्यक ताण कमी होईल.

## ईव्ही गाड्यांसाठी सरकारकडून टोलमाफी

**मुंबई/प्रतिनिधी** : सध्याच्या काळात पेट्रोल-डिझेलच्या वाढत्या किमती आणि इंधन टंचाईमुळे सर्वसामान्य नागरिक हैराण झाले असताना, महाराष्ट्र सरकारने ई-वाहन धारकांसाठी आनंदाची बातमी दिली आहे. जर तुम्ही इलेक्ट्रिक कार किंवा बसने प्रवास करत असाल, तर आता मुंबई-पुणे एक्सप्रेसवे किंवा समृद्धी महामार्गावर तुम्हाला एक रुपयाही टोल भरावा लागणार नाही. प्रदूषण कमी करण्यासोबतच सर्वसामान्यांच्या खिशाला दिलासा देण्यासाठी सरकारने तब्बल ४६ कोटी रुपयांच्या सवलतींचा बूस्टर डोस जाहीर केला असून, ईव्ही खरेदीवर दीड लाखांपर्यंत सबसिडी देण्याची मोठी घोषणा केली आहे.

ईव्ही गाड्या खरेदी करण्यासाठी सरकार प्रोत्साहन देत आहे. आता सरकारने ईव्ही बस आणि कारसाठी खास ६ महामार्गावर टोलमाफ करण्याची घोषणा केली आहे. धोरणानुसार मुंबई पुणे एक्सप्रेस वे, हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे महाराष्ट्र समृद्धी महामार्ग आणि अटल सेतू यांसारख्या प्रमुख महामार्गांवर ई वाहनांना विशेषत: चारचाकी आणि बस यांना १०० टक्के टोल माफ करण्यात आला आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या इतर रस्त्यांवर ५० टक्के सवलत देण्याची तरतूद करण्यात आली आहे.

युद्धामुळे इंधन टंचाई असल्याने महाराष्ट्रात सरकारने ई वाहन धोरणांतर्गत ४६ कोटी रुपयांच्या सवलतींचा बूस्टर डोस दिला. त्याच सोबत सहा महामार्गांवर टोलमाफीची घोषणा केली आहे. ईव्ही कार खरेदी करणाऱ्यांना खास सरकार सब्सिडी देखील देत आहे. या सगळ्यामुळे इंधनाचा वापर कमी होईल आणि प्रदूषणात देखील घट होईल असा विश्वास सरकारला आहे.

शासकीय अनुदानामुळे ई वाहनांच्या किंमती कमी होऊन सर्वसामान्य लोकांना आता कार किंवा बाइक अगदी सहज खरेदी करता येणार आहे. त्यामुळे खर्चाची बचत होईल आणि कार घेण्याचा आनंदही मिळेल. महाराष्ट्रात नोंदणी केल्या जाणाऱ्या ईव्ही वाहनांना रस्ते कर आणि नोंदणी शुल्कातून १०० टक्के सूट देण्यात आली आहे.

नव्या धोरणानुसार ई दुचाकीसाठी १० हजार आणि कारसाठी दीड लाख रुपयांपर्यंतची थेट सब्सिडी दिली जात आहे. या सगळ्या सवलतींमुळे ईव्ही वाहनांच्या खरेदीत वाढ होईल असा विश्वास सरकारचा आहे. त्यामुळे ईव्ही गाड्या खरेदी करण्याचे आवाहन सरकारकडून केलं जात आहे. त्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीनं सब्सिडी, करात सूट दिली जात आहे.

## सातारा जिल्हा परिषद सभापतींची उद्या निवड


**सातारा/प्रतिनिधी** : सातारा जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण, महिला व बालकल्याण तसेच इतर दोन विषय समित्यांच्या सभापती पदासाठी ४ एप्रिल २०२६ रोजी दुसरी विशेष सभा आयोजित करण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी जिल्हा परिषद इमारतीच्या १०० मीटर परिसरात प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. या आदेशाच्या पार्श्वभूमीवर महायुतीच्या घटक पक्षाने सावध भूमिका घेत आपली रणनीती स्पष्ट केली आहे. सभापतीपदी महायुतीतील भाजप, राष्ट्रवादी व शिवसेना यापैकी कुठल्या पक्षांचे सभापती होणार याविषयी मोठी उत्सुकता आहे. सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष व उपाध्यक्ष पदाच्या निवडीनंतर सभापती पदाच्या निवडी शनिवार (दि. ४) रोजी सातारा जिल्हा परिषदेच्या सभागृहामध्ये होत आहेत. मागील राजकीय गोंधळाचा अनुभव लक्षात घेता कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक आदेश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी जाहीर केले आहेत. हे आदेश शनिवारी सकाळी सात वाजल्यापासून सभा संपेपर्यंत लागू राहणार आहेत.

## होर्मुज सामुद्रधुनी पुन्हा खुली करा, भारताची मागणी

**वृत्तसंस्था/नवी दिल्ली**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाच्या पार्श्वभूमीवर इराणच्या नियंत्रणात गेलेली होर्मुजची सामुद्रधुनी पुन्हा खुली करण्याची भारताने मागणी केली आहे. परराष्ट्र सचिव विक्रम मिस्री यांनी ब्रिटनच्या पुढाकाराने आयोजित बहुपक्षीय बैठकीत ही भूमिका मांडली. या संघर्षात जलमार्गावर आपले नागरिक गमावणारा भारत हा एकमेव देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ब्रिटनने आयोजित केलेल्या या आभासी बैठकीत ६० हून अधिक देश सहभागी झाले होते. बैठकीचा मुख्य उद्देश होर्मुज सामुद्रधुनीत सुरक्षित आणि निर्बाध जहाजवाहतूक सुनिश्चित करणे हा होता. या संकटामुळे जागतिक तेलाच्या किमतीत मोठी वाढ होत आहे. परराष्ट्र मंत्रालयाच्या निवेदनानुसार, मिस्री यांनी आंतरराष्ट्रीय जलमार्गांमध्ये मुक्त



नौवहनाच्या तत्त्वावर भर दिला. तसेच या संघर्षाचा भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर होत असलेला परिणामही त्यांनी अधोरेखित केला.बैठकीत त्यांनी सांगितले की, होर्मुज परिसरातील व्यापारी जहाजांवरील हल्ल्यांमध्ये भारतानेच सर्वाधिक नुकसान सोसले आहे. डायरेक्टोरेट जनरल ऑफ शिपिंगच्या माहितीनुसार, विदेशी ध्वज असलेल्या जहाजांवर कार्यरत किमान तीन भारतीय खलाशांचा मृत्यू झाला असून एक जखमी आहे. काही जहाजे अद्यापही या सामुद्रधुनीत अडकलेली आहेत.

मिस्री यांनी इशारा दिला की, या प्रदेशातील अस्थिरतेचा थेट परिणाम भारताच्या ऊर्जा सुरक्षेवर होत आहे. भारत हा जगातील प्रमुख कच्चे तेल आयात करणाऱ्या देशांपैकी एक असल्याने पश्चिम आशियातील परिस्थितीचा देशाच्या अर्थव्यवस्थेवर मोठा प्रभाव पडत आहे. या संकटावर तोडगा काढण्यासाठी तणाव कमी करणे आणि सर्व पक्षांमध्ये संवाद व कूटनीती हाच एकमेव मार्ग असल्याचे त्यांनी नमूद केले. भारताने पुन्हा एकदा स्पष्ट केले की व्यापारी जहाजांवरील हल्ले अस्वीकार्य आहेत आणि आंतरराष्ट्रीय जलमार्गांमध्ये मुक्त वाहतूक सुनिश्चित केलीच पाहिजे.

आखाती देशांमध्ये सुमारे एक कोटी भारतीय नागरिक वास्तव्यास आहेत. परराष्ट्र मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सर्व भारतीय नागरिक सुरक्षित असून भारतीय दूतावास त्यांच्या सतत संपर्कात आहेत. आतापर्यंत या संघर्षात ८ भारतीयांचा मृत्यू झाला असून एक जण बेपत्ता आहे.

# जल जीवन मिशनचा बट्ट्याबोळ

### नागापूरमध्ये अजूनही पाण्यासाठी

## महिलांची पायपीट




### आमसभेत 'पूर्ण' घोषित योजना प्रत्यक्षात ठप्प; अधिकाऱ्यांच्या दाव्यांवर ग्रामस्थांचा संताप

**डोणगाव (दैनिक आपला विदर्भ प्रतिनिधी)**

**ग्रामीण भागातील नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्यासाठी शासनाने 'हर घर नल, हर घर जल' या उद्दिष्टाने जल जीवन मिशन योजना राबवली. मात्र मेहकर तालुक्यातील नागापूर येथे या योजनेचा अक्षरशः बट्ट्याबोळ झाल्याचे वास्तव समोर आले आहे. तब्बल १ कोटी २५ लाख ३४ हजार रुपयांचा निधी मात्र गावात अद्याप पाणी पोहोचलेले नाही.**

भाग ०१





या योजनेचा कार्यारंभ आदेश ९ मार्च २०२२ रोजी देण्यात आला होता. नियोजनानुसार प्रत्येक नागरिकाला दररोज ५५ लिटर पाणी मिळणे अपेक्षित होते. मात्र प्रत्यक्षात योजना पूर्ण होण्यापूर्वीच बारगळल्याचे चित्र असून, गावातील महिलांना आजही डोक्यावर हंडे घेऊन पाण्यासाठी पायपीट करावी लागत आहे.

दरम्यान, ३१ मार्च रोजी मेहकर येथे झालेल्या वार्षिक आमसभेत तालुक्यातील सात गावांमध्ये जल जीवन मिशन योजना पूर्ण झाल्याचा दावा पाणीपुरवठा विभागाने केला. या बैठकीत अधिकाऱ्यांनी स्वतःची पाठ थोपटून घेतली. मात्र त्या सात गावांपैकी नागापूरचे वास्तव पूर्णपणे वेगळे असल्याचे उघड झाले आहे.

'दैनिक आपला विदर्भ'ने नागापूर येथे प्रत्यक्ष भेट देऊन नागरिकांशी संवाद साधला असता, गेल्या अनेक महिन्यांपासून गावात पाणीपुरवठाच झालेला नाही, तसेच योजना प्रत्यक्षात सुरूही नसल्याचा गंभीर आरोप ग्रामस्थांनी केला. अधिकाऱ्यांकडून ''योजना जवळपास पूर्ण झाली'' असा दावा करण्यात येत असला, तरी प्रत्यक्षात चित्र मात्र वेगळच काही दिसून आले.

आमसभेत आमदार सिद्धार्थ खरात, संबंधित अधिकारी व अनेक गावांतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशा परिस्थितीत लोकप्रतिनिधींसमोरच अधिकाऱ्यांनी चुकीची माहिती देत दिशाभूल केल्याचा आरोप होत आहे. उन्हाळ्याच्या झळा वाढत असताना नागापूरमध्ये पाणीटंचाई तीव्र होत असून, नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. संबंधित अधिकाऱ्यांवर दबाव होता का? की केवळ कामगिरी दाखवण्यासाठी खोटे दावे करण्यात आले? असा सवाल उपस्थित केला जात आहे.

दरम्यान, नागापूर ग्रामस्थांनी खोटी माहिती देणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कारवाई करावी, अशी ठाम मागणी केली आहे. जल जीवन मिशनसारख्या महत्त्वाच्या योजनेत झालेल्या या प्रकारामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

## दुहेरी धोरणामुळे नक्षलवादाचा पाया ढासळला...

लोकसभेत सोमवारी सायंकाळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी देशातील नक्षलवादाचा अंत झाल्याचे ठासून सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने २०१४ सालीच नक्षलवादाचा अंत करायचा, असे ठरवले होते. केंद्रीय गृहमंत्रिपदाची सूत्रे हाती घेतल्यानंतर अमित शाह यांनीदेखील 'दि. ३१ मार्च २०२६ पर्यंत देशातून नक्षलवाद हद्दपार करू' अशी घोषणा केली होती. मात्र, अनेकांनी या घोषणेस गांभीर्याने घेतले नव्हते. 'गरिबी हटाव'छाप गांधी-नेहरू घराण्याच्या घोषणांवर हयात गेलेल्या इकोसिस्टमने तर या घोषणेची खिल्लीच उडविली. मात्र, ते करताना आता सत्तेत नक्षलवाद्यांचे पालनकर्ते सत्तेत नसल्याचा या इकोसिस्टमला विसर पडला होता. परिणामी, इकोसिस्टम आपल्याच मस्तीत मश्गूल होती. त्याच वेळी केंद्र सरकारने नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी कालबद्ध रणनीती आखून त्यावर काम करण्यास सुरुवात केली होती. आपल्या भाषणामध्ये केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी निःसंदिग्धपणे सांगितले की, ''भारतातून नक्षलवाद आता संपुष्टात आला आहे, हे सांगण्यास कोणतीही अडचण नाही.'' भारताच्या या नक्षलवादविरोधी लढ्याचा अभ्यास करता, त्यामध्ये दिसणारी विशेष बाब म्हणजे पुनर्वसनास देण्यात आलेले प्राधान्य. नक्षलवाद्यांनी हाती शस्त्रे घेऊन भारताविरोधातच युद्ध पुकारले होते. मात्र, त्यांचा बीमोड करताना त्यांना प्रथम आत्मसमर्पणाची संधी देण्यात आली. त्यासाठी विविध योजनाही अमलात आणल्या गेल्या. केंद्र सरकार, महाराष्ट्र सरकार, छत्तीसगढ सरकार आणि ओडिशा सरकारच्या योजना यामध्ये प्रमुख ठरल्या आहेत. महाराष्ट्राचा नक्षलवादाविरोधातील दृष्टिकोन हा आत्मसमर्पण आणि पुनर्वसनाच्या धोरणाशी सुसंगत असा समन्वित आणि बहुआयामी आहे. केंद्र सरकारच्या योजनेशी संलग्न असलेल्या राज्याच्या धोरणामुळे लाभांचे वितरण आणि अंमलबजावणीमध्ये एकसारखेपणा राखला गेला आहे. 'एसआरई' आणि 'एससीए'अंतर्गत मिळालेल्या केंद्रीय निधीमुळे राज्याला एकाच वेळी कठोर सुरक्षा कारवाया राबवताना पुनर्वसनाचे प्रयत्नही प्रभावीपणे पुढे नेता आले आहेत. छत्तीसगढ आणि ओडिशासोबतच्या संयुक्त त्रिराज्यीय कारवायांमध्ये महाराष्ट्राची सक्रिय भूमिका दिसून येते, जिथे आत्मसमर्पण धोरणे अंमलबजावणीला पूरक ठरतात. प्रमाणित केंद्रीय पुनर्वसन पॅकेजेसमुळे आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना आर्थिक मदत आणि कौशल्य प्रशिक्षणाच्या समान संधी उपलब्ध झाल्या. कारवाईचा वाढता दबाव आणि विश्वासार्ह पुनर्वसन पर्याय, यामुळे नक्षलवाद्यांसाठी सुरक्षित आश्रयस्थाने जवळपास संपुष्टात आली असून, आत्मसमर्पणाचा मार्ग ते चोखाळत आहेत. जिल्हा खनिज निधी (डीएमएफ) अंतर्गत राबविण्यात आलेल्या प्रकल्पांमुळे, विशेषतः गडचिरोलीसारख्या भागांमध्ये पायाभूत सुविधा, शिक्षण आणि रोजगारनिर्मितीला चालना मिळाली आहे. रस्ते-जोडणी, मोबाईल नेटवर्कचा विस्तार आणि खाणकाम व औद्योगिक प्रकल्पांमधून निर्माण झालेल्या रोजगाराच्या संधींमुळे स्थानिक लोकांचे बंडखोर नेटवर्कवरील अवलंबित्व कमी झाले आहे. तसेच कौशल्य विकास कार्यक्रम आणि 'सी-६०' दलासारख्या पोलीस भरती मोहिमांमुळे युवकांना मुख्य प्रवाहात येण्याचे आणि प्रशासनात सहभागी होण्याचे नवे मार्ग खुले झाले आहेत. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व यामध्ये अतिशय महत्त्वाचे ठरले आहे. एकूणच, महाराष्ट्राचे मॉडेल हे विकासाधिष्ठित आत्मविश्वास निर्माण करणे, सुरक्षा यंत्रणेचा दबाव कायम ठेवणे आणि पुनर्वसनासाठी प्रोत्साहन देणे, या तिन्ही घटकांचा संतुलित मेळ साधणारे आहे. विकास आणि स्थानिक उपक्रमांच्या भक्कम पाठबळावर पुनर्वसन धोरणांचे संस्थात्मकीकरण झाल्यामुळे जमिनीवरील समीकरणे बदलत आहेत. परिणामी, कट्टर माओवादी हळूहळू वेगळे पडत असून, वाढत्या संख्येने कार्यकर्ते मुख्य प्रवाहात परत येताना दिसत आहेत. छत्तीसगढने नक्षलवादाविरोधातील लढ्यात आत्मसमर्पण आणि पुनर्वसनाला केंद्रस्थानी ठेवत प्रभावी, प्रोत्साहनाधारित धोरण उभे केले. २०२४ मधील सुधारित धोरणामुळे आत्मसमर्पणात वाढ झाली असून, रुपये ५० हजार तत्काळ मदत, रँकनुसार रुपये तीन ते रुपये १२ लाखांपर्यंत बक्षिसे आणि शस्त्रसमर्पणासाठी मोठी आर्थिक प्रोत्साहने देऊन निःशस्त्रीकरणाला चालना मिळाली आहे. उच्च-मूल्य कार्यकर्त्यांसाठी रुपये दहा लाख मदत किंवा शासकीय नोकरीची संधी, तसेच जमीन-घर साहाय्यामुळे दीर्घकालीन स्थैर्य सुनिश्चित होते. रोजगार, कौशल्य विकास, खासगी क्षेत्रातील सहभाग आणि शैक्षणिक-सामाजिक सवलतींमुळे पुनर्वसन अधिक मजबूत झाले आहे. 'बस्तर ऑलिम्पिस', 'बस्तर पांडम', 'पूना मार्गम' आणि 'नियाद नेल्लानार' यांसारख्या उपक्रमांनी सामाजिक समावेश वाढवत स्थानिक पाठिंबा कमी केला असून, छत्तीसगढ आत्मसमर्पणासाठी आकर्षक केंद्र बनले आहे. ओडिशानेही संरचित आणि प्रोत्साहन-संलग्न मॉडेलद्वारे आत्मसमर्पणाला गती दिली. अडीच लाख ते पाच लाख रुपये आर्थिक मदत, वर्तणुकीशी जोडलेली टप्प्याटप्प्याची देयके, उच्च-मूल्य कार्यकर्त्यांसाठी रुपये दहा लाख प्रोत्साहन आणि शस्त्रसमर्पणासाठी श्रेणीबद्ध रक्कम, यामुळे निःशस्त्रीकरणाला चालना मिळाली आहे. ३६ महिन्यांचे मासिक विद्यावेतन, गृहनिर्माण, आरोग्यसेवा, कौशल्य विकास आणि सामाजिक सुरक्षा योजनांमुळे पुनर्वसन अधिक प्रभावी झाले आहे. सहकार्याच्या अटींवर आधारित या धोरणामुळे गुप्तचर यंत्रणांना मदत होत असून, प्रतिबंध आणि प्रोत्साहन यांचा संतुलित मेळ साधत ओडिशाने ऐच्छिक आत्मसमर्पणाची प्रक्रिया मजबूत केली आहे. एकूणच पाहता, नक्षलवादाविरोधातील लढा हा केवळ सुरक्षा कारवायांचा प्रश्न राहिलेला नसून, तो विकास, सुशासन आणि वैचारिक स्पष्टतेचा संगम बनला आहे. छत्तीसगढ, महाराष्ट्र आणि ओडिशा यांसारख्या राज्यांनी आत्मसमर्पण आणि पुनर्वसनाच्या प्रभावी धोरणांद्वारे नक्षलवाद्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा मार्ग खुला केला आहे, तर केंद्र सरकारने ठोस राजकीय इच्छाशक्ती आणि समन्वित कारवाईच्या माध्यमातून या लढ्याला निर्णायक वळण दिले आहे. पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि डिजिटल कनेटिव्हिटी यांचा विस्तार झाल्याने नक्षलग्रस्त भागांतील 'राज्याचा अभाव' मोठ्या प्रमाणात कमी झाला आहे. याचबरोबर, आत्मसमर्पणासाठी आकर्षक प्रोत्साहने आणि पुनर्वसनाच्या विश्वासार्ह संधी उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे हिंसेचा मार्ग सोडण्याची प्रवृत्ती वाढली आहे. गुप्तचर यंत्रणा, तंत्रज्ञानाचा वापर आणि सुरक्षा दलांच्या समन्वित प्रयत्नांमुळे नक्षलवादी संघटनांची संरचना कमकुवत झाली असून, त्यांचे जाळे हळूहळू कोसळताना दिसत आहे. त्यामुळे नक्षलवाद हा 'विकासाचा प्रश्न' नसून, 'विचारसरणीचा संघर्ष' असल्याचे अधिक स्पष्ट झाले आहे. आज परिस्थिती अशी आहे की, एकीकडे कठोर कारवाई आणि दुसरीकडे विकासाधिष्ठित पुनर्वसन या दुहेरी धोरणामुळे नक्षलवादाचा पाया ढासळत आहे. परिणामी, देश नक्षलमुक्त भारताच्या दिशेने निर्णायक पाऊल टाकताना दिसत आहे.

# भारताची ताकद वाढली!

## तिसरी आण्विक पाणबुडी आयएनएस अरिदमन नौदलात दाखल




**मुंबई/प्रतिनिधी :** जागतिक स्तरावर परिस्थिती दिवसेंदिवस तणावपूर्ण होत असताना भारतानं आपल्या लष्करी सामर्थ्यामध्ये भरभक्कम वाढ केली आहे. शुक्रवारी बॅलिस्टिक मिसाईलने सज्ज 'आयएनएस अरिदमन' ही तिसरी आण्विक पाणबुडी भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल झाली आहे. घ्ए अरिदमनमुळे भारताची सागरी आण्विक ताकद मोठ्या प्रमाणावर वाढली आहे. याचसोबत भारतीय नौदलाच्या विशाखापट्टणम येथे झालेल्या कार्यक्रमात अत्याधुनिक बनावटीच्या घ्ए तारागिरीचंदेखील जलावतरण पार पडलं. यावेळी देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची प्रमुख उपस्थिती होती.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांची सूचक पोस्ट!

दरम्यान, आज आयएनएस अरिदमन व आयएनएस तारागिरी यांच्या जलावतरणाच्या पार्श्वभूमीवर देशाचे संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी मोजक्या शब्दांमध्ये शेअर केलेल्या पोस्टमध्ये सूचक इशारा देण्यात आला आहे. ''फक्त बोलत नाही, करून दाखवतो'', अशा आशयाची पोस्ट राजनाथ सिंह यांनी शुक्रवारी सकाळी शेअर केली होती.

राजनाथ सिंह यांनी विशाखापट्टणम येथे झालेल्या कार्यक्रमात केलेल्या भाषणादरम्यान आयएनएस अरिदमन भारताच्या नौदलाच्या ताफ्यात दाखल झाल्यामुळे वाढलेल्या सामर्थ्याचा मोठ्या गौरवपूर्ण शब्दांमध्ये उल्लेख केला. तसेच, भारताच्या सागरी सीमा आता अधिक सुरक्षित झाल्याचाही विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला.

आयएनएस अरिदमनच्या समावेशामुळे आता भारताच्या सागरी सीमांना तिहेरी संरक्षण लाभलं आहे. याआधी भारताच्या ताफ्यात असणाऱ्या आयएनएस अरिहंत व आयएनएस अरिघात या लांब पल्ल्याच्या अण्वस्त्रवाहू पाणबुड्यांच्याच बाजूला आता शत्रूला धडकी भरवणारं सामर्थ्य घेऊन आयएनएस अरिदमन उभी राहिली आहे. त्यामुळे भारताच्या सागरी सीमांची सुरक्षा अधिक बळकट झाली आहे.

फक्त तीन नाही, चौथीही पाणबुडी येतेय!

भारताच्या अ्नरहमब ऊाम्प्हदत्दुबब न्नोतब (अऊन्न्) प्रकल्पाचा भाग म्हणून या पाणबुड्या भारतीय नौदलात टप्प्याटप्प्याने दाखल होत आहेत. या प्रकल्पाची एकूण किंमत तब्बल ९० हजार कोटी इतकी आहे. याच प्रकल्पातील पुढचा टप्पा म्हणजेच चौथी बॅलिस्टिक मिसाईलने सज्ज आण्विक पाणबुडी लवकरच भारतीय नौदलाच्या ताफ्यात दाखल होणार आहे. या पाणबुडीसह आयएनएस अरिदमनच्या मोठ्या आकारामुळे या दोन्ही पाणबुड्या ख-४ श्रेणीतील क्षेपणास्त्रे वाहून नेऊ शकतात. त्यामुळे भारताची शत्रूवर मारा करण्याची क्षमता मोठ्या प्रमाणावर वाढणार आहे.

# माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव:

## आरोग्य समृद्ध महाराष्ट्राची लोकचळवळ

महाराष्ट्राच्या ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदलण्यासाठी आणि ग्रामीण जनतेला दर्जेदार आरोग्य सुविधा त्यांच्या उंबरठ्यावर उपलब्ध करून देण्यासाठी राज्य सरकारने 'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' हे अत्यंत महत्त्वाकांक्षी अभियान सुरू करण्याचा निर्णय घेतला असून या राज्यव्यापी अभियानाला एप्रिलपासून प्रारंभ करण्यात आला आहे.

सार्वजनिक आरोग्य विभागाच्यावतीने जिल्हास्तरीय पदाधिकारी, अधिकारी आणि कर्मचाऱ्यांकरिता श्रीमती काशीबाई नवले वैद्यकीय महाविद्यालय, सामान्य रुग्णालय येथे आयोजित 'माझं गाव,आरोग्य संपन्न गाव' विभागीय कार्यशाळेचे सहभागी झाले होते. हे अभियान फक्त सरकारी कार्यक्रमापुरते मर्यादित न राहता, लोकसहभागाद्वारे त्यातून एक व्यापक आरोग्य चळवळ उभी राहावी, असा राज्य शासनाचा मानस आहे. या अभियानांतर्गत प्रत्येक गाव आरोग्यसंपन्न केले जाणार आहे. या प्रस्तावित योजनेमुळे गावापासून ते राज्यस्तरावरील आरोग्य सेवांचे आणि यंत्रणांचे सक्षमीकरण होण्यास मदत होणार आहे. तसेच या उपक्रमामुळे तळागाळातील लोकांपर्यंत वैद्यकीय सेवा पोहोचणार आहेत.




सार्वजनिक आरोग्य विभाग
महाराष्ट्र शासन

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाचे सर्वात महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे उपचारांपेक्षा प्रतिबंधावर भर, हे आहे. ग्रामीण भागातील नागरिकांच्या आरोग्यविषयक सामाजिक वर्तणुकीत सकारात्मक बदल घडवून आणणे आणि त्यांच्यात आरोग्यदायी जीवनशैली रुजवणे हे या मोहिमेचे मुख्य उद्दिष्ट आहे. यामध्ये फक्त आजारांवर उपचार करण्यापेक्षा ते होऊ नयेत यासाठी सार्वजनिक स्वच्छता, शुद्ध पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन आणि पोषण यासारख्या मूलभूत घटकांवरही विशेष लक्ष केंद्रित केले जाणार आहे. संसर्गजन्य आजारांसोबतच बदलत्या जीवनशैलीमुळे उद्भवणारे असंसर्गजन्य आजार, माता-बाल आरोग्य आणि मानसिक आरोग्य यासारख्या विषयांनाही या मोहिमेत सामावून घेण्यात आले आहे. या अभियानात ग्रामपंचायतीपासून ते जिल्हा परिषदेच्या आरोग्य यंत्रणा सक्रियपणे सहभागी होणार आहेत. गावागावात स्वच्छतेचा आणि आरोग्याचा जागर करून आरोग्यदायी गाव ही संकल्पना राबवण्याचा राज्य सरकारचा प्रयत्न असणार आहे.

**सुदृढ गावांना मिळणार 'आरोग्यसंपन्न गाव' किताब**

'माझं गाव, आरोग्यसंपन्न गाव' या अभियानाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी राज्यस्तरापासून ते ग्रामपंचायत स्तरापर्यंत तीन टप्प्यांवर समित्या स्थापन करण्यात आल्या आहेत. आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या अध्यक्षतेखालील राज्यस्तरीय समिती ही अभियानाच्या संपूर्ण प्रक्रियेवर देखरेख ठेवणार आहे. तर आरोग्य विभागाच्या प्रधान सचिवांच्या नेतृत्वाखालील कृती समिती प्रत्यक्ष कामाचे नियोजन करणार आहे. त्याचबरोबर गाव पातळीवर आरोग्याचे मूल्यांकन करण्यासाठी विशिष्ट निकष ठरवण्यात आले आहेत. या निकषांच्या आधारे ७० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना 'आरोग्यसंपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येणार आहे. अशा गावांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र आणि रोख रकमेचा पुरस्कार देऊन प्रोत्साहित केले जाणार आहे. या संपूर्ण अभियानासाठी राज्य सरकारने ८०.७५ कोटी रुपयांचा निधी मंजूर केला आहे. अभियानात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्हा परिषद, पंचायत समिती, गाव, प्राथमिक आरोग्य केंद्र यांना कोट्यवधी रुपयांपर्यंतची बक्षिसे दिली जाणार आहेत.

**दोन ते पाच कोटींचे पुरस्कार**

राज्यस्तरावर उत्कृष्ट कामगिरी करीत पहिला क्रमांक मिळवणाऱ्या जिल्हा परिषदेला ५ कोटी रुपये, दुसऱ्या क्रमांकाला ३ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकासाठी २ कोटी रुपये दिले जाणार आहेत. जिल्हा परिषदेनंतर पंचायत समिती स्तरावरही प्रोत्साहनासाठी मोठ्या रक्कमेची तरतूद आहे. ज्यामध्ये पहिल्या क्रमांकाला २ कोटी, दुसऱ्या क्रमांकाला १.५ कोटी रुपये आणि तिसऱ्या क्रमांकाला १.२५ कोटी रुपये दिले जाणार आहेत. राज्यस्तरावर सर्वोत्तम ठरणाऱ्या ग्रामीण रुग्णालय आणि उपजिल्हा रुग्णालयांना ७५ लाख रुपयांचा विशेष पुरस्कार दिला जाणार आहे. उपआरोग्य केंद्रांना पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा आणि राज्यस्तरासाठी अनुक्रमे ५ लाख आणि २५ लाख रुपये दिले जाणार आहे. तर प्राथमिक आरोग्य केंद्रांना जिल्हा स्तरावर १० लाख आणि राज्य स्तरावर ५० लाखांचा पुरस्कार दिला जाणार आहे. त्याचबरोबर गावांनाही पहिल्या क्रमांकासाठी जिल्हा, विभाग राज्य स्तरासाठी अनुक्रमे २५ लाख, १ कोटी आणि ५ कोटी रुपयांचे पुरस्कार दिले जाणार आहेत. हे अभियान दरवर्षी १ एप्रिल ते ३१ मार्च या आर्थिक वर्षाच्या कालावधीत राबवले जाणार असल्याने, प्रत्येक वर्षी गावांना आपली कामगिरी सुधारण्याची आणि पुरस्कार मिळवण्याची संधी मिळणार आहे.

**संकलन-जिल्हा माहिती कार्यालय, पुणे**

# वन व्यवस्थापनाची वाटचाल डिजिटल दिशेने

महाराष्ट्र वन विभागाने गेल्या १५० दिवसांत डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करत प्रशासनाच्या कार्यपद्धतीत लक्षणीय बदल घडवून आणले आहेत. नागरिकाभिमुख सेवा, पारदर्शकता, तक्रार निवारण, डेटा व्यवस्थापन आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर या सर्व बाबींमध्ये विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत शासनाच्या ई-गव्हर्नन्स धोरणाला गती दिली आहे. या कालावधीत विभागाने केवळ सेवा वितरण सुधारले नाही, तर पर्यावरण संवर्धन आणि वन व्यवस्थापनातही तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून एक आदर्श निर्माण केला आहे.

राज्य शासनाच्या १५० दिवसाच्या ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमात महाराष्ट्र वन विभागाने उल्लेखनीय कामगिरी करत मंत्रालयीन विभागात राज्यात दुसरे स्थान पटकावले. विभागाला २०० पैकी १७१.५ गुण मिळाले असून डिजिटल कारभारात तो अग्रगण्य विभागांपैकी एक ठरला आहे. या यशाबद्दल वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर यांचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रमाणपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला.

वन विभागाचे संकेतस्थळ हे आधुनिक, सुरक्षित आणि सर्वसमावेशक बनविण्यात आले आहे. संकेतस्थळाचा लोडिंग वेळ पाच सेकंदांपेक्षा कमी ठेवण्यात यश आले असून, मोबाइल, टॅबलेट आणि संगणक या सर्व माध्यमांवर ते सुलभपणे कार्यरत आहे. विविध ब्राउझरवरही ते सुरळीत चालते, ही बाब विशेष महत्त्वाची आहे. संकेतस्थळावर मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे, त्यामुळे सर्व स्तरातील नागरिकांना त्याचा लाभ घेता येतो. संकेतस्थळावर दरमहा सुमारे १.८६ लाख वापरकर्ते भेट देत असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते, ज्यातून त्याची उपयुक्तता अधोरेखित होते.सुलभता आणि सर्वसमावेशकता यावर विशेष भर देण्यात आला आहे. संकेतस्थळावर स्क्रीन रीडर, टेक्स्ट रिसाइज, कीबोर्ड नेव्हिगेशन यासारख्या सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. दिव्यांग नागरिकांसाठीही संकेतस्थळ सहज वापरता येईल, याची काळजी घेण्यात आली आहे. यासोबतच सायबर सुरक्षा आणि प्रमाणपत्रांच्या दृष्टीनेही संकेतस्थळाने उच्च मानके पूर्ण केली आहेत. सर्ट-इन मान्यताप्राप्त सायबर सुरक्षा तपासणी आणि जीआयजीडब्ल्यू मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करण्यात आले आहे, ज्यामुळे नागरिकांचा विश्वास वाढला आहे.

वन विभागाच्या कामकाजात पारदर्शकता आणण्यासाठी संकेतस्थळावर 'सिटिझन चार्टर', आरटीआय विभाग, 'व्हॉट्स न्यू' सेक्शन आणि विविध शासकीय निर्णयांची माहिती नियमितपणे अद्ययावत करण्यात येते. नागरिकांना आवश्यक माहिती सहज मिळावी यासाठी सर्च सुविधा, व्हॉइस-टू-टेक्स्ट शोध आणि साइटमॅप यासारख्या सुविधा देण्यात आल्या आहेत. त्यामुळे नागरिकांना माहिती शोधणे अधिक सोपे झाले आहे.

सेवा वितरणाच्या बाबतीत वन विभागाने मोठी झेप घेतली आहे. विभागाकडून एकूण ३२ सेवा उपलब्ध करून देण्यात येतात, त्यापैकी १३ सेवा लोकसेवा हक्क अधिनियम नाअंतर्गत अधिसूचित असून त्या सर्व ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध आहेत. 'आपले सरकार' पोर्टलशी एकत्रीकरण केल्यामुळे नागरिकांना घरबसल्या अर्ज करणे, फाइलची स्थिती तपासणे आणि सेवा मिळवणे शक्य झाले आहे. या सेवांमध्ये तेंदू व्यापारी नोंदणी, वन्यजीवांमुळे झालेल्या नुकसानीसाठी भरपाई, सॉ मिल परवाना नूतनीकरण, संरक्षित क्षेत्रात छायाचित्रण परवानगी यासारख्या महत्त्वाच्या सेवांचा समावेश आहे.

या कालावधीत वन विभागाकडून सुमारे १.६३ लाख अर्जांची यशस्वी पूर्तता करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, नागरिकांकडून पहिल्या किंवा दुसऱ्या स्तरावरील अपिलांची संख्या शून्य असल्याचे दिसून येते, यावरून सेवा वितरणातील कार्यक्षमता स्पष्ट होते. याशिवाय, ८९७ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, सर्व कर्मचाऱ्यांनी डिजिटल प्रणाली आत्मसात केल्याचे दिसून येते.

तक्रार निवारण व्यवस्थेतही वन विभागाने प्रभावी कामगिरी केली आहे. जवळपास ९९८ तक्रारींचे निराकरण करण्यात आले असून, त्यापैकी अनेक तक्रारींचे वेळेत निवारण करण्यात आले आहे. एस्कलेशनची सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे नागरिकांना तक्रारींचा पाठपुरावा करणे सोपे झाले आहे. तक्रार निवारणानंतर नागरिकांकडून मिळालेला सरासरी अभिप्राय ८.७१ इतका असून, यावरून नागरिकांचे समाधान दिसून येते.

वन विभागाने डेटा ॲनालिटिक्सचा प्रभावी वापर करून निर्णय प्रक्रियेला गती दिली आहे. रेट्रोस्पेक्टिव्ह, इन्फरेंशियल आणि प्रेडिक्टिव्ह ॲनालिटिक्सचा वापर करून तक्रारींचे विषण करण्यात येते आणि त्यानुसार धोरणात्मक निर्णय घेतले जातात. यामुळे समस्यांचे मूळ कारण ओळखून त्यावर दीर्घकालीन उपाययोजना करता येतात.

ई ऑफिस प्रणालीमुळे विभागाच्या अंतर्गत कामकाजात मोठी सुधारणा झाली आहे. ई ऑफिसद्वारे १४,५५३ फाईल्स तयार करण्यात आल्या असून, त्यापैकी ४,०६३ फाईल्स निकाली काढण्यात आल्या आहेत. फाईल प्रक्रियेतील टप्प्यांची संख्या चारवरून तीनपर्यंत कमी करण्यात आली आहे, ज्यामुळे निर्णय प्रक्रियेला वेग आला आहे. डिजिटल पद्धतीने फाईल व्यवस्थापन केल्यामुळे पारदर्शकता आणि कार्यक्षमता वाढली आहे. डॅशबोर्ड प्रणालीमुळे विभागाच्या कामकाजावर प्रभावी नियंत्रण ठेवणे शक्य झाले आहे. विविध योजनांची प्रगती, वृक्षलागवड, बांबू मिशन आणि राज्यस्तरीय प्रकल्पांचे निरीक्षण एका ठिकाणी करता येते. मुख्यमंत्री डॅशबोर्डशी एकत्रीकरण केल्यामुळे वरिष्ठ स्तरावरून देखरेख सुलभ झाली आहे.

नागरिकांशी संवाद साधण्यासाठी व्हॉट्सॲप चॅटबॉटचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. मराठी आणि इंग्रजी या दोन्ही भाषांमध्ये कार्यरत असलेला हा चॅटबॉट केवळ तीन टप्प्यांत नागरिकांना आवश्यक माहिती उपलब्ध करून देतो. विविध योजनांबाबत जनजागृती करण्यासाठी या माध्यमाचा उपयोग करण्यात आला आहे.

वन व्यवस्थापनातही तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आधारित बिबट्या ट्रॅकिंग, ताडोबा येथे व्हर्च्युअल वॉल, आग शोध प्रणाली आणि मार्व्हल यासारख्या उपक्रमांमुळे वन्यजीव संरक्षण आणि आपत्ती व्यवस्थापन अधिक सक्षम झाले आहे. जीआयएस प्रणालीच्या वापरामुळे वनक्षेत्राचे अचूक मॅपिंग आणि नियोजन करता येत आहे.

महाराष्ट्र वन विभागाने १५० दिवसात केलेल्या कामगिरीतून प्रशासनातील डिजिटल परिवर्तनाची प्रभावी अंमलबजावणी कशी करता येते, याचे उत्तम उदाहरण घालून दिले आहे. या उपक्रमांमुळे सेवा वितरण अधिक वेगवान, पारदर्शक आणि नागरिकाभिमुख झाले असून, पर्यावरण संवर्धनालाही चालना मिळाली आहे. भविष्यातही तंत्रज्ञानाच्या साहाय्याने वन व्यवस्थापन अधिक सक्षम करण्याचा विभागाचा निर्धार दिसून येतो. ''वन विभागाने ई गव्हर्नन्स सुधारणा उपक्रमाअंतर्गत राबविलेल्या डिजिटल उपक्रमांमुळे प्रशासनात केवळ तांत्रिक बदल झाले नाहीत, तर कार्यपद्धतीतही आमूलाग्र सुधारणा घडून आली आहे. यामुळे नागरिकांना सेवा मिळण्याची प्रक्रिया अधिक सोपी आणि वेगवान झाली आहे. वन्यजीव संरक्षणासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित प्रणाली, जीआयएस तंत्रज्ञान आणि डेटा ॲनालिटिक्सचा वापर करून आम्ही निर्णय प्रक्रियेला अधिक शास्त्रीय आधार दिला आहे. या सर्व उपक्रमांचा थेट लाभ नागरिकांना मिळत असून, पारदर्शक आणि जबाबदार प्रशासनाची दिशा अधिक मजबूत होत आहे.'' – वनमंत्री गणेश नाईक

''ई गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमामध्ये आम्ही 'डिजिटल फर्स्ट' या दृष्टीकोनातून काम करत सेवा वितरण, तक्रार निवारण आणि अंतर्गत प्रशासन या तिन्ही स्तरांवर सुधारणा केल्या आहेत. नागरिकांच्या अभिप्रायाचा आणि तक्रारींच्या डेटाचा अभ्यास करून धोरणात्मक निर्णय घेतले जात आहेत. यामुळे केवळ कार्यक्षमता वाढली नाही, तर सेवा अधिक अचूक, पारदर्शक आणि परिणामकारक बनल्या आहेत. आगामी काळातही तंत्रज्ञानाचा अधिक व्यापक वापर करून वन व्यवस्थापन आणि नागरिक सेवा अधिक सक्षम करण्याचा आमचा भर राहील.'

**– मिलिंद म्हैसकर,**
**अपर मुख्य सचिव,**
**वन विभाग, महाराष्ट्र शासन**

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरी करूया : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आढावा बैठक संपन्न

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी दिलेल्या विचारांनी आणि संविधानाने देशाला प्रगतीची दिशा मिळाली आहे. त्यांचे कार्य आणि त्यांनी समाजाच्या उन्नतीसाठी दिलेले योगदान समाजातील प्रत्येक घटकापर्यंत पोहोचवणे हे अत्यंत आवश्यक आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त होणारा कार्यक्रम दरवर्षी अधिक उत्कृष्ट करण्याचा प्रयत्न राज्य शासन करत असून, यावर्षीही विविध विभागांच्या समन्वयातून तो अधिक भव्य स्वरूपात साजरा करण्यात येईल. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीचा सोहळा त्यांच्या विचारांचा उत्सव म्हणून साजरा करूया, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १४ एप्रिल, २०२६ रोजीच्या १३५ व्या जयंतीच्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली सह्याद्री अतिथीगृह येथे आढावा बैठक झाली. त्यावेळी ते बोलत होते.

या बैठकीस बैठकीस सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट, माजी राज्यमंत्री भाई गिरकर, माजी आमदार प्रकाश गजभिये, मुंबई



महापालिकेच्या आयुक्त अश्विनी भिडे, अपर मुख्य सचिव लोकेश चंद्र, नगरविकास विभागाचे अपर मुख्य सचिव गोविंदराज, कोकण विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती, प्रधान सचिव श्रीकर परदेशी, सामाजिक न्याय विभागाचे प्रधान सचिव हर्षदीप कांबळे, भन्ते डॉ. राहूल बोधी महाथेरो, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाणदिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, दादर चैत्यभूमी स्मारक समितीचे प्रतिनिधी यांच्यासह विविध विभागाचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, महापुरुषांच्या जयंती साजरी करण्यामागील उद्देश केवळ औपचारिकता नसून त्यांच्या विचारांची आणि कार्याची प्रेरणा पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविणे असा आहे. डॉ. आंबेडकरांनी दिलेले संविधान हे जगातील सर्वोत्तम संविधानांपैकी एक असून, त्यातील समावेशकतेच्या तत्त्वामुळे भारत विकसित राष्ट्राकडे वाटचाल करत आहे. समाजाला मिळणाऱ्या संधी, हक्क आणि प्रगती यामागे कोणाचे योगदान आहे, हे नव्या पिढीला समजणे आवश्यक आहे. त्यामुळे जयंती सोहळा हा केवळ उत्सव न राहता विचारांचा प्रसार करणारा पर्व ठरतो.

भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या दि.१४ एप्रिल २०२६ रोजी होणाऱ्या जयंती उत्सवासाठी देशभरातून लाखो नागरिक चैत्यभूमीवर येतात. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर चैत्यभूमी परिसरात अभिवादनासाठी येणाऱ्या अनुयायी आणि नागरिकांसाठी आवश्यक सोयीसुविधांची सर्वंकष व्यवस्था करण्यात यावी. उष्णतेपासून संरक्षण मिळावे यासाठी ठिकठिकाणी मंडप उभारण्यात यावेत. प्रामुख्याने पिण्याच्या पाण्याची व्यवस्था उपलब्ध ठेवावी. तसेच, दादर आणि परिसरातील वाहतूक सुरळीत राहावी यासाठी वाहतूक पोलिसांनी योग्य नियोजन करून नियंत्रण ठेवावे, असे निर्देशही मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी संबधित अधिकाऱ्यांना दिले.

नागरिकांना मार्गदर्शन होण्यासाठी विविध ठिकाणी सूचना फलक लावावेत. बेस्ट प्रशासनाने दादर रेल्वे स्थानक ते चैत्यभूमी दरम्यान पुरेशा प्रमाणात बससेवा उपलब्ध करून द्यावी, जेणेकरून नागरिकांची ये-जा अधिक सुलभ होईल. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची जयंती देशासह जगभर मोठ्या प्रमाणावर साजरी होत असल्याचा उल्लेख करत, हा सोहळा अधिक उत्तम पद्धतीने साजरा करण्याची जबाबदारी आपली असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

मंत्री संजय शिरसाट म्हणाले,भारतीय संविधान प्रत्येक घरापर्यंत पोहोचवण्याचा उपक्रम विभागामार्फत हाती घेण्यात आला असून, जिल्हाधिकारी कार्यालयांच्या माध्यमातून त्याची अंमलबजावणी सुरू आहे. नागरिकांमध्ये संविधानाबाबत जागरूकता निर्माण करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. डॉ. बाबसाहेब आंबेडकरांचा ''शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा'' हा संदेश लक्षात घेऊन विद्यार्थ्यांसाठी मोठ्या प्रमाणावर वसतिगृहांची उभारणी करण्यात येत आहे. जयंती सोहळ्याच्या निमित्ताने यावर्षी काही विशेष उपक्रमही राबविण्यात येणार आहेत. १३ एप्रिल रोजी सायंकाळी ड्रोनच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांच्या जीवनावर आधारित भव्य ड्रोन शो चैत्यभूमी परिसरात सादर करण्यात येणार आहे.

या बैठकीत पोलीस पथक मानवंदना, चैत्यभूमीवर हेलिकॉप्टरद्वारे पुष्पवृष्टी, शिवाजी महाराज मैदानावरील भव्य निवास मंडप, तेथील आपत्कालीन व्यवस्थेसह, आरोग्य सुविधा, प्रदर्शन मंडप, चैत्यभूमी स्तूप व परिसराची सजावट, लोकराज्य मासिकाचा विशेषांक, शासकीय जाहिरात व प्रसिध्दी याबाबत चर्चा झाली व याबाबत निर्देश देण्यात आले.

बैठकीत मुंबई महापालिकेच्यावतीने नियोजनाची सविस्तर माहिती सादरीकरणातून देण्यात आली. यावेळी मान्यवरांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पोस्टरचे विमोचन करण्यात आले.

## महसूल विभागात परभणी जिल्हा वसुलीत अव्वल; १५० टक्के वसुली



दैनिक आपला विदर्भ

**छत्रपती संभाजीनगर/प्रतिनिधी :** छत्रपती संभाजीनगर महसूल विभागामध्ये परभणी जिल्ह्याने वसुलीत पहिला क्रमांक पटकावला आहे. विभागातील सर्व जिल्ह्यांना मागे टाकत परभणीने तब्बल दीडशे टक्के वसुली केली आहे. अशी माहिती पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांनी दिली.

परभणी येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाच्या प्रांगणात विभागीय महसूल क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धांच्या उद्घाटन प्रसंगी पालकमंत्री मेघना बोर्डीकर बोलत होत्या.मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांतील महसूल अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचा या क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग आहे.

यावेळी बोलताना त्यांनी सांगितले की, महसूल वसुलीत परभणी जिल्ह्याने उत्कृष्ट कामगिरी करत विभागात प्रथम क्रमांक मिळवला आहे. प्रशासनाच्या एकत्रित प्रयत्नांमुळे ही यशस्वी कामगिरी साध्य झाली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

## कल्याणमध्ये स्टंटबाजांचा हैदोस; जागरुक नागरिकांचे पालक आणि पोलिसांना आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**कल्याण/प्रतिनिधी :** कल्याणमधील गांधारी रिंग रोड हा स्टंटबाजांचा अड्डा बनल्याचे समोर आले आहे. एका निष्पाप व्यावसायिकाच्या मृत्यूनंतरही स्टंटबाजी थांबलेली नसून पुन्हा एकदा स्टंटबाजीचे प्रकार समोर आले आहेत. यामुळे संतप्त नागरिकांनी पालक आणि पोलिस प्रशासनाला कठोर कारवाईचे आवाहन केले आहे.

कल्याणमधील गांधारी रिंग रोड परिसरात रात्रीच्या वेळी स्टंटबाजी आणि रेसिंगचे प्रकार वाढले आहेत. या स्टंटबाजीमुळे केवळ अपघातांचा धोका वाढत नाही, तर परिसरातील नागरिकांनाही मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

रेसिंगमुळे होणाऱ्या ध्वनीप्रदूषणामुळे नागरिकांच्या झोपेचे खोबरे झाले आहे. लहान मुले दचकून उठतात, तर आजारी आणि वयोवृद्ध नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

जागरूक नागरिकांनी या प्रकारांवर संताप व्यक्त करत पालकांनी आपल्या मुलांवर लक्ष ठेवावे, असे आवाहन केले आहे. अल्पवयीन मुलांच्या हातात वाहने देणे धोकादायक ठरत असल्याचेही त्यांनी सांगितले.तसेच पोलिसांनी या स्टंटबाजांवर कठोर कारवाई करावी आणि नियम अधिक कडक करावेत, अशी मागणीही नागरिकांकडून केली जात आहे. दरम्यान, याच स्टंटबाजीमुळे एका सायकलस्वाराचा मृत्यू झाल्याची घटना घडली होती. त्यानंतरही हे प्रकार सुरूच असल्याने नागरिकांमध्ये भीती आणि संतापाचे वातावरण आहे.

# भाजपाच्या स्थापना दिनानिमित्त राज्यभर विविध कार्यक्रमांचे आयोजन

## मुख्यमंत्री फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांच्यासह अनेक ज्येष्ठ नेते, मंत्री सहभागी होणार

दैनिक आपला विदर्भ

### प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांची माहिती

**मुंबई/प्रतिनिधी :** भारतीय जनता पार्टीच्या स्थापना दिनानिमित्त ५ ते १२ एप्रिल याकाळात रोजी राज्यभर अनेक कार्यक्रमांचे आयोजन होणार असल्याची माहिती प्रदेश उपाध्यक्ष केशव उपाध्ये यांनी शुक्रवारी दिली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत श्री. उपाध्ये बोलत होते. प्रदेश मुख्य प्रवक्ते नवनाथ बन यावेळी उपस्थित होते. या निमित्ताने होणाऱ्या कार्यक्रमांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण, ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील दानवे, सुधीर मुनगंटीवार यांच्यासह उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह राज्यातील सर्व मंत्री, अन्य लोकप्रतिनिधी जनतेशी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधणार आहेत. या निमिताने राष्ट्रवादी विचारांचा उत्सव साजरा होईल, असेही श्री. उपाध्ये यांनी नमूद केले.


श्री. उपाध्ये यांनी सांगितले की, ६ एप्रिल रोजी भारतीय जनता पार्टीचा स्थापना दिन आहे. या निमित्त २८८ विधानसभा मतदारसंघात, ३६ जिल्ह्यात आणि राज्यातील १ लाख बुथवर स्थापना दिनाचे कार्यक्रम होणार आहेत. प्रत्येक बुथवर वॉल पेंटिंग, ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सत्कार, सक्रीय कार्यकर्त्यांचे मेळावे, समाजातील नामवंत व्यक्तींशी संपर्क, सार्वजनिक ठिकाणी स्वच्छता, केंद्र व राज्य सरकारच्या योजनांच्या लाभार्थ्यांशी संपर्क असे कार्यक्रम होणार आहेत. वॉल पेंटिंग मध्ये प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांच्यासह पक्षाचे सर्व प्रमुख नेते आपापल्या मतदारसंघात वॉल पेंटिंग मध्ये सहभागी होणार आहेत. त्याबरोबरच केंद्र आणि राज्य सरकारच्या कामगिरीची माहिती घरोघरी पोहचवण्यात येणार आहे. पक्षाचे सक्रीय कार्यकर्ते आपल्या घरावर पक्षाचा झेंडा फडकवणार आहेत. ६ एप्रिल रोजी राज्यातील ५१ लाख घरांवर भाजपाचा झेंडा फडकावला जाईल. तसेच पक्षाच्या आजवरच्या वाटचालीनिमित्त तयार करण्यात आलेला माहितीपट दाखविण्यात येणार आहे. दोन खासदारांपासून जगातील सर्वात मोठ्या पक्षापर्यंतचा भारतीय जनता पार्टीचा प्रवास यातून उलगडला




जाणार आहे. पक्षाच्या संघटनात्मक रचनेतील १२०० मंडलांमध्ये हे कार्यक्रम होणार आहेत.

या बरोबरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे मुंबईत, प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण व अन्य प्रमुख नेते, मंत्री ६ व ७ एप्रिल रोजी पक्ष कार्यकर्ते व जनतेशी संवाद साधतील. सर्व ३६ जिल्ह्यांमध्ये हा कार्यक्रम होईल. गाव चलो, वस्ती चलो या कार्यक्रमांतून पक्षाचे पदाधिकारी, नेते, कार्यकर्ते जनसंपर्क अभियान राबविणार आहेत, अशी माहिती श्री. उपाध्ये यांनी दिली.

## शब्दकोडे क्र. 99



आडवे शब्द

१. दडपण, वजन ३. आकाशाला भेदणारा आवाज इत्यादी ८. गंध १०. भ्रम १२. बर्फाचा पर्वत १४. गरजू १६. रानात जाणारा रस्ता १८. वाकबगार, निपुण २०. साप २१. गाढव २२. जिवंत २४. घरातील मोठी माणसे २६. मोठी बहीण २७. शेंगेवरील आवरण, फोलपट २९. खुंटी, मेख ३०. पंख ३२. उत्तराधिकारी ३३. जन्म-मृत्यू ३५. फोडातील द्रव ३७. मधली बहीण ३८. रुचीहीन, बेचव ४०. उथळ मोठी वाटी ४१. राजवाडा ४२. प्रत्युत्तर ४३. इक्षुदंड, यापासून साखर बनवितात ४४. शूर ४५. खण पण कापड नव्हे ४६. श्रेष्ठ पुरुष ४९. कजाग स्त्री, आदिमाया ५१. सोन्याचे शिवकालीन नाणे ५३. हात ५५. तिरळा, काणा ५६अ. सत्त्व ५७. प्रताप, विक्रम ५९. प्रेत ६१. कलावंत ६३. मोठी जाड सतरंजी ६४. झाड ६५. चटकन रागावणारा ६६. काळ्या पाठीचे हरिण ६९. मुंबईतील एक उपनगर ७२. व्यवस्था, उद्योग ७३. समानता ७४. पेन-पन्सिलीची पेटी ७७. परिस्थिती ७८. झाडाची त्वचा ७९. पुरणाची आमटी, कोल्हापुरी मिसळीतील रस्सा ८०. पाटलाचे काम

उभे शब्द

२. पूर्ण बहिरा ३. चुकीचे (हिंदी) ४. क्षमा, दुर्लक्ष ५. चीर, फट ६. नवऱ्याचा भाऊ ७. मित्र, सोबती ९. एकूणात प्रमाण १०. किंमत ११. पाचवीला पुजली जाणारी १३. कापड विणण्याचे साधन १५. पशू १७. आकाश १९. मूळ आधार २१. कृष्णसखी २२. मिठाई तयार करणारा २३. तपासणी करणारा २५. बारीकसारीक २६. तारणारा २८. काढलेली सुट्टी ३०. अत्युच्च लष्करी बहुमान ३१. पांढरे केस लपवणारा ३४. अभिनेता ३६. खुंट, आंचळ ३७. संमोहित करणारे सौंदर्य ३९. मदतनीस ४७. मोजकेपणा, मितता ४८. सरस्वतीच्या जवळील वाद्य ४९. भ्रमर, भुंगा ५०. माणुसकी ५२. नकला करणारा ५४. धपाटा ५६. न्यूनता ५६ब. प्रभात ५८. सज्जनगडचे संत ६०. मऊ पदार्थाचा आघात ६२. दही घुसळण्याचे साधन ६६. फळावरील साल ६८. रायगडावरील एक कडा ७०. धमकी ७१. पवित्र, शुद्ध ७४. मनाचा ओढा ७५. घट्ट, धन ७६. शिल्लक राहिलेली रक्कम

### शब्दकोडे क्र. 98 चे उत्तर

आडवे उत्तर

१.समाचार घेणे ५.अज ७.पावसाळा १०.धड ११.चर १२.हितोपदेश १३.सम १४.मैना १५.सामना १६.जनगणना १८.कात्री १९.भू २०.तमासगीर २३.खास २५.जमा २७.ततपप २९.नावडतीचे मीठ अळणी ३३.रसा ३५.तन ३६.ळण ३८.राजवट ३९.नादावणे ४१.परवा ४३.अमर ४५.रन ४६.नकुल सहदेव ४९.मध ५०.जन्म ५१.रास ५३.वडा ५४.वळ ५५.हारजीत ५७.काजवा ५८.श्रावण ५९.वपन ६१.लव ६५.टरकणे ६७.हारा ६९.साखर ७१.कळक ७३.माळ ७४.जनगणमन ७६.समई ७८.पापा ७९.रसरशीत ८२.समरस ८३.मदन ८४.परीक्षा

उभे उत्तर

१.सधन २.माड ३.रचना ४.घेर ५.अतोनात ६.जप ७.पाश ८.सामान ९.सामनावीर १२.हिम १३.सण १४.मैत्री १६.जरतर १७.गडप १८.कासव २१.मावळण २२.गीत २३.खानावळ २४.युती २५.जमीनदार २६.माठ २८.पसारा ३०.डमडम ३१.चेतना ३२.अळणे ३४.नवरदेव ३७.बारकुडा ४०.वनराज ४१.पनवती ४२.वाल ४३.अधर ४४.रजतपट ४७.सजावट ४८.वळणदार ४९.महान ५२.सवाल ५६.जीव ६०.नरमाई ६२.वर्तन ६३.वहाण ६४.घळ ६६.कळ ६८.रामरक्षा ७०.खलाशी ७१.कळस ७२.कसर ७४.जपान ७५.नस ७७.मस ७८.पाद ८०.रस्सी ८१.तळे

# कारमधून एमडी ड्रग्ज तस्करी उघड; शिरपूर पोलिसांची मोठी कारवाई

**दैनिक आपला विदर्भ**

**धुळे/प्रतिनिधी :** धुळे जिल्ह्यातील शिरपूर शहरात एमडी (मेफेड्रोन) या अंमली पदार्थाच्या तस्करीविरोधात पोलिसांनी मोठी कारवाई करत एका संशयिताला अटक केली आहे. या कारवाईत सुमारे चार लाख रुपये किमतीचे अंमली पदार्थ तसेच एक कार असा एकूण १० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

शिरपूर शहर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोरकुमार परदेशी यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे ही कारवाई करण्यात आली.

शहादा फाट्यावरील हॉटेल भद्रा समोर पोलिसांनी संशयिताची कार अडवून तपासणी केली. तपासणीदरम्यान त्याच्या ताब्यातून २० ग्रॅम एमडी ड्रग जप्त करण्यात आले. जयपाल गिरासे (रा. शिरपूर) असे अटक करण्यात आलेल्या संशयिताचे नाव असून, तो हे अंमली पदार्थ विक्रीसाठी आणल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे. संबंधित आरोपीने हे अंमली पदार्थ कुठून आणले आणि कोणत्या जाळ्याशी त्याचा संबंध आहे, याचा पुढील तपास पोलीस करत आहेत. या कारवाईमुळे परिसरातील अंमली पदार्थांच्या वाढत्या तस्करीला आळा बसण्याची अपेक्षा व्यक्त होत असून, या प्रकरणातून मोठ्या ड्रग्ज रॅकेटचा पर्दाफाश होण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.




## वृत्तविशेष...

### यवतमाळात विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस; पुसदमध्ये वीज पडून महिलेचा मृत्यू, पती गंभीर



**दैनिक आपला विदर्भ**

**यवतमाळ/प्रतिनिधी :** जिल्ह्यात गुरुवारी सायंकाळी अचानक हवामानात बदल होऊन विजांच्या कडकडाटासह मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. राळेगाव, आर्णी आणि पुसद तालुक्यांमध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे शेतीपिकांचे नुकसान झाले असून शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. दरम्यान, पुसद तालुक्यात अत्यंत दुर्दैवी घटना घडली.

वीज कोसळून एका महिलेचा जागीच मृत्यू झाला, तर तिचा पती गंभीर जखमी झाला आहे. जखमी पतीवर स्थानिक रुग्णालयात उपचार सुरू असून त्याची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती मिळाली आहे. हवामान विभागाने पुढील चार दिवसांसाठी वादळी पाऊस आणि विजांचा इशारा दिला होता. त्यानुसार जिल्ह्यात अचानक पावसाने हजेरी लावल्याने नागरिकांची तारांबळ उडाली. अनेक ठिकाणी विजांच्या कडकडाटामुळे भीतीचे वातावरण निर्माण झाले. या अवकाळी पावसामुळे उभ्या पिकांना फटका बसल्याची प्राथमिक माहिती असून नुकसानाचे पंचनामे करण्याची प्रक्रिया प्रशासनाकडून सुरू होण्याची शक्यता आहे. दरम्यान, प्रशासनाने नागरिकांना वादळी व पावसाळी वातावरणात घराबाहेर न पडण्याचे, तसेच सुरक्षित ठिकाणी राहण्याचे आवाहन केले आहे.

### मार्चमध्ये युपीआयमधून नागरिकांनी केले कोटींचे व्यवहार; युपीआय ठरतोय वरदान

**दैनिक आपला विदर्भ**

**मुंबई/प्रतिनिधी :** भारताने सुरु केलेली यूपीआय ही डिजिटल प्रणाली आज जगभर पोहोचली आहे. हातात कॅश नसेल तर आता घाबरून न जात आपण बिनधास्तपणे डिजिटल प्रणाली वापरत आहोत. अगदी किराणा म ालापासून ते लाखोंचे व्यवहार करण्यापर्यंत युपीआय वापरले जाते आहे. सणासुदीच्या काळात तर या व्यवहारांत अधिक भर पडते. प्रसिद्ध झालेल्या आकडेवारीनुसार मागच्या मार्च महिन्यात युपीआयने पेमेंट करणाऱ्यांची संख्या ही कोटींपर्यंत पोहोचली आहे. आणि एकट्या मार्च महिन्यात २२.६४ अब्ज असे विक्रमी संख्येने व्यवहार पार पडले आहेत. मार्च २०२५ महिन्याची तुलना करता, मार्च २०२६ मध्ये या व्यवहारांमध्ये १९ टक्के वाढ नोंदवली गेली आहे. तसेच फ ेब्रुवारीत एकूण २६.८४ लाख रुपये इतके व्यवहार झाले असून मार्च महिन्यात त्यात १० टक्क्यांनी वाढले आहेत.

मार्च महिन्यातील सण

मार्च महिन्यात होळी, धूलिवंदन, रंगपंचमी, गुढीपाडवा, ईद असे अनेक सण तसेच देवतांच्या यात्रा – जत्रा, उत्सव असतात. या निमित्ताने देशात ठिकठिकाणी मोठ्या प्रमाणात खरेदी होते. या खरेदीसाठी यूपीआयचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात आला. दररोज सरासरी ७३ कोटी व्यवहार झाले आहेत असे निदर्शनास आले. ज्यांचे दैनिक मूल्य हे ९५,२४३ कोटी रुपये इतके आहे.

आजच्या काळात भारतात डिजिटल पेमेंट्सवर जास्त भर दिला जात आहे. एकूण डिजिटल व्यवहारांपैकी जवळपास ८५ टक्के व्यवहार हे पूर्णपणे युपीआयच्या आधाराने केले जातात.

### शिडीवरुन पाय घसरला अनब सगळं संपलं

**दैनिक आपला विदर्भ**

**पुणे/प्रतिनिधी :** हवेली तालुक्यातील वरदाडे येथे खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात एक धक्कादायक घटना घडली. यात पुलाचे काम सुरू असताना एका २२ वर्षीय ऑपरेटरचा पाण्यात पडून बुडून मृत्यू झाला आहे. विजय कुमार (वय २२, मूळ रा. प्रयागराज, उत्तर प्रदेश) असे मृत तरुणाचे नाव आहे. तो रिंगरोडच्या कामावर बुलडोझर ऑपरेटर म्हणून कार्यरत होता. बुधवारी सायंकाळी ६ च्या सुमारास ही घटना घडली. वरदाडे येथे सध्या रिंगरोडसाठी पुलाचे काम सुरू आहे. विजय कुमार हा आपल्या बुलडोझरवर चढत असताना अचानक शिडीवरून त्याचा पाय घसरला. तो थेट नदीपात्रातील खोल पाण्यात कोसळला. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दल, पोलीस आणि स्थानिक नागरिकांनी बचाव कार्य सुरू केले. मात्र दुर्दैवाने त्याचा जीव वाचू शकला नाही. या घटनेत सुरक्षेच्या नियमांकडे मोठे दुर्लक्ष झाल्याचे प्राथमिक तपासात समोर आले आहे. धरणाच्या पाणलोट क्षेत्रात काम करत असताना विजयने कोणत्याही प्रकारचे लाईफ जॅकेट किंवा सुरक्षात्मक साधने वापरली नव्हती. कामाच्या ठिकाणी आवश्यक असलेली इतर सुरक्षितता साधने उपलब्ध नसल्याचे किंवा ती वापरली जात नसल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.विजय कुमार हा कामाच्या निमित्ताने पुण्यात वास्तव्यास होता. त्याच्या निधनामुळे उत्तर प्रदेशातील त्याच्या मूळ गावी आणि मित्रपरिवारात शोककळा पसरली आहे.

### फलटण महिला डॉक्टर मृत्यू प्रकरणात पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदनेला जामीन

**दैनिक आपला विदर्भ**

**कोल्हापूर/प्रतिनिधी:** सातारा जिल्ह्यातील फलटण येथे महिला डॉक्टर आत्महत्येप्रकरणी मागील पाच महिन्यांपासून तुरुंगात असलेला निलंबित पोलीस उपनिरीक्षक (झएघ) गोपाळ बदने याला मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचने ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला आहे. यामुळे पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने तुरुंगाबाहेर येणार आहे.

काय आहे प्रकरण ?

फलटणमधील एका हॉटेलच्या रूममध्ये महिला डॉक्टरने गळफास घेऊन स्वत:चा जीवनप्रवास संपवला. या महिला डॉक्टरने मृत्यूपूर्वी स्वत:च्या हातावर पीएसआय गोपाळ बदने आणि प्रशांत बनकर या दोघांची नावे लिहिली होती. या प्रकरणात तपास करून पोलिसांनी गुन्हा नोंदवला. यानंतर पोलिसांनी गोपाळ बदने आणि प्रशांत बनकर या दोघांना अटक केली. दोघांवर महिला डॉक्टरचा शारीरिक आणि मानसिक छळ केल्याचा आरोप ठेवण्यात आला.

मागील पाच महिन्यांपासून गोपाळ बदने तुरुंगात होता. जाम ीन मिळवण्यासाठी त्याने मुंबई उच्च न्यायालयाच्या कोल्हापूर सर्किट बेंचकडे अर्ज केला होता. या प्रकरणात सुनावणीअंती कोल्हापूर सर्किट बेंचने आरोपी पोलीस उपनिरीक्षक गोपाळ बदने याला ५० हजार रुपयांच्या वैयक्तिक जातमुचलक्यावर जामीन मंजूर केला.

## महसूल विभागाच्या सक्षमीकरणासाठी सुधारित आकृतीबंध मंजूर

### बुलढाणा जिल्ह्यात नवीन कार्यालयांची निर्मिती

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** राज्यातील महसूल प्रशासनातील कामाचा वाढता व्याप आणि नागरिकांची सोय विचारात घेऊन महसूल व वन विभागाने २ एप्रिल २०२६ रोजी विभागाचा नवीन सुधारित आकृतीबंध मंजूर केला आहे. या निर्णयानुसार बुलढाणा जिल्ह्यासाठी नवीन अपर जिल्हाधिकारी कार्यालय आणि तीन नवीन अपर तहसीलदार कार्यालयांना मंजुरी देण्यात आली आहे. सिंदखेडराजा तालुक्यातील साखरखेर्डा, मेहकर तालुक्यातील डोनगाव आणि खामगाव तालुक्यातील लखनवाडा येथे ही नवीन अपर तहसीलदार कार्यालये (लहान गट) कार्यान्वित होणार आहेत.

या ऐतिहासिक निर्णयामुळे महसूल विभागातील मंजूर पदांचा सर्वंकष आढावा घेऊन एकूण ३४,५७६ नियमित आणि १,३०० बाह्यस्त्रोतामार्फत भरावयाच्या पदांचा सुधारित आकृतीबंध निश्चित करण्यात आला आहे. बुलढाणा जिल्ह्याची गणना मोठ्या जिल्ह्यांच्या श्रेणीत करण्यात आली असून, अशा जिल्ह्यांसाठी नियमित १५१ पदे आणि बाह्ययंत्रणेमार्फत ११ पदे मंजूर करण्यात आली आहेत. नवीन निर्माण होणाऱ्या अपर जिल्हाधिकारी कार्यालयासाठी १३ नियमित पदे, तर नवीन लहान अपर तहसीलदार कार्यालयांसाठी प्रत्येकी ७ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत.

नवीन कार्यालयांचे मुख्यालय आणि कार्यक्षेत्र निश्चित करताना लोकसंख्या, तालुक्यांची संख्या आणि भौगोलिक क्षेत्रफळ या निकषांचा विचार केला जाणार आहे. अपर तहसीलदार कार्यालयाचे कार्यक्षेत्र निश्चित करताना मंडळ हा घटक महत्त्वाचा मानला असून, कोणत्याही एका मंडळाचे विभाजन दोन कार्यालयांत होणार नाही याची दक्षता घेण्यात येईल.

या नवीन रचनेमुळे महसूल प्रशासनाच्या कामात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवून कामकाज अधिक सक्षम करण्यावर भर दिला जाणार आहे. नवीन कार्यालयांच्या निर्मितीमुळे जिल्ह्यातील नागरिकांना जमिनीचे दाखले, महसुली प्रकरणे आणि इतर शासकीय सेवांसाठी आता स्थानिक पातळीवरच सोय उपलब्ध होणार असून प्रशासकीय कामांना मोठी गती मिळणार आहे.

## ज्येष्ठ गायक अजित कडकडे यांना संगीत रत्न जीवन गौरव पुरस्कार देऊन केलं सन्मानित

हैदराबाद : मराठी इंडी संगीत क्षेत्राला समर्पित असलेला, मराठी इंडी म्युझिक अवॉर्ड्स मिमा २०२६ हा भव्य कार्यक्रम मोठ्या थाटात पार पडला आहे. महाराष्ट्र आर्ट्स अँड कल्चर फाऊंडेशन यांच्या वतीनं आयोजित केलेला या कार्यक्रमात स्वातंत्र्यवीर सावरकर सभागृहाचे अध्यक्ष रणजीत सावरकर, मंजिरी मराठे, प्रियांका बर्वे, मंदार चोळकर, सावनी रविंद्र, कार्तिकी गायकवाड, अविनाश विश्वजीत यांच्यासह संगीत क्षेत्रातील अनेक मान्यवर हजर होते. गेल्या काही वर्षांत मराठी इंडी संगीतानं स्वतःची एक चांगलीच ओळख निर्माण केली आहे. चित्रपटांच्या चौकटीबाहेर पडत, स्वतंत्रपणे संगीतनिर्मिती करणाऱ्या कलाकारांनी या नव्या लाटेला 'मिमा'सारख्या व्यासपीठामुळं योग्य ओळख आणि प्रोत्साहन मिळत असल्याचेही यावेळी अधोरेखित केलं. तसेच कार्यक्रमात गायक, संगीतकार, वादक, गीतकार, तांत्रिक क्षेत्रातील कलावंतांचा सन्मान करून इंडी संगीताच्या सर्वांगीण प्रवासाचा गौरव करण्यात आला.



अजित कडकडे यांना 'संगीत रत्न जीवन गौरव पुरस्कार' : या सोहळ्यात शास्त्रीय संगीत आणि भजनासाठी प्रसिद्ध असणारे ज्येष्ठ गायक अजित कडकडे यांना 'संगीत रत्न जीवन गौरव पुरस्कार' देऊन त्यांचा सन्मान करण्यात आला. गीतकार गुरु ठाकूर आणि गायिका बेला शेंडे यांना 'मराठी इंडी म्युझिक आयकॉन' पुरस्कार दिला गेला. याशिवाय बासरीवादनातील उत्कृष्टतेसाठी अमर ओक यांना 'एक्सलेन्स इन म्युझिक अवॉर्ड', तर तांत्रिक क्षेत्रातील योगदानासाठी प्रमोद चांदोरकर यांना 'टेक्निकल एक्सलेन्स इन म्युझिक अवॉर्ड' दिला. 'सोबतीचा करार' या कार्यक्रमाला 'आयकॉनिक म्युझिक शो'चा मान मिळाला, तर अवधूत गुप्ते यांच्या 'आई' याला, या अल्बमला 'आयकॉनिक म्युझिक अल्बम' म्हणून गौरविण्यात आलं.

'मिमा' सोहळा संपन्न : तसेच विशेष कामगिरीची दखल घेत आकाश देशमुख (टेंभुर्णी) यांना 'विशेष दिव्यांग कलाकार पुरस्कार'नं सन्मानित करण्यात आलं, तर परदेशात मराठी संस्कृतीचा ठसा उमटवणाऱ्या व्ही. रमेश (सौदी अरब) यांना 'प्रवासी मराठी कलाकार पुरस्कार' देण्यात आला. दरम्यान उपक्रमाबाबत आयोजक अजय नाईक यांनी सांगितलं की, ''आजचा 'मिमा' सोहळा म्हणजे केवळ पुरस्कार वितरण नाही, तर मराठी इंडी संगीताच्या वाढत्या सामर्थ्याचा उत्सव आहे. स्वतःच्या बळावर उभं राहिलेलं हे संगीत आता केवळ पर्याय राहिलेलं नाही, तर मुख्य प्रवाहात आपली जागा निर्माण करत आहे. आमचा उद्देश केवळ पुरस्कार देण्यापुरता मर्यादित नाही, तर या कलाकारांना दीर्घकालीन व्यासपीठ, योग्य ओळख आणि उद्योगाशी जोडणं हा आहे.मिमाच्या माध्यमातून मराठी इंडी संगीताला जागतिक स्तरावर पोहोचवण्याचा आमचा प्रयत्न पुढंही सुरू राहील.''

### अंजनगाव पुतळा वादावरून गोपीचंद पडळकरांची टीका; वक्तव्यामुळे नवा वाद

**दैनिक आपला विदर्भ**

**सोलापूर/प्रतिनिधी :** सोलापूर जिल्ह्यातील अंजनगाव येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळा उभारणीवरून सुरू असलेल्या वादाला आता राजकीय वळण मिळाले आहे. भाजपाचे आमदार यांनी या प्रकरणावर भाष्य करत आंदोलकांवर तीव्र टीका केली.

पडळकर यांनी रात्रीच्या वेळी पुतळा उभारण्याची गरज काय, असा सवाल उपस्थित केला. शिवाजी महाराज हे सर्वांच्या अस्मितेचे प्रतीक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. पुतळ्याला कोणताही विरोध नसून, तो ज्या ठिकाणी उभारला जात आहे त्या ठिकाणी जातीयवाद आणि राजकारण होत असल्याचा आरोप त्यांनी केला.




खेलोबा देवस्थानाच्या आवारात पुतळा उभारणे सहन केले जाणार नाही, तो अन्य योग्य ठिकाणी उभारावा, अशी मागणीही त्यांनी केली. तसेच, पुतळा उभारण्याची जबाबदारी दिल्यास तो वाजतगाजत उभारून दाखवू, असेही त्यांनी म्हटले.

यावेळी राज्याच्या राजकारणावर भाष्य करत, मुख्यमंत्री झाल्यानंतर राज्यात वातावरण अस्थिर करण्याचे प्रयत्न होत असल्याचा आरोप त्यांनी केला. दरम्यान, आंदोलकांवर टीका करताना पडळकर यांची जीभ घसरल्याचे समोर आले असून, त्यांनी केलेल्या शिवराळ वक्तव्यामुळे या प्रकरणाला नव्या वादाची किनार मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## बाळा शेडगे यांची मनसेच्या बुलढाणा जिल्हा संपर्क अध्यक्षपदी नियुक्ती

**दैनिक आपला विदर्भ**

**बुलढाणा/प्रतिनिधी :** महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी पक्षातील ज्येष्ठ व अनुभवी नेते बाळाभाऊ शेडगे यांची बुलढाणा जिल्हा संपर्क अध्यक्षपदी नियुक्ती जाहीर केली आहे. नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

पुणे महानगरपालिकेचे माजी नगरसेवक असलेले शेडगे हे पक्ष स्थापनेपासून मनसेशी निष्ठेने जोडलेले आहेत. पक्षविस्तार, संघटन मजबुतीकरण आणि कार्यकर्त्यांना एकत्रित ठेवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे. त्यांच्या नेतृत्वगुणांमुळे त्यांची पक्षात ठळक ओळख निर्माण झाली आहे. शेडगे यांनी पुणे महानगरपालिकेच्या शिक्षण मंडळावर सदस्य म्हणूनही काम केले आहे. तसेच मनसेचे पुणे शहर अध्यक्ष असताना त्यांच्या नेतृत्वाखाली २९ नगरसेवक निवडून आले होते.

त्या काळात पुणे महानगरपालिकेत मनसेचा विरोधी पक्षनेताही होता, ही बाब विशेष मानली जाते. राजकीय कारकिर्दीच्या सुरुवातीला त्यांनी च्या विद्यार्थी संघटना भारतीय विद्यार्थी सेनेत सक्रिय सहभाग घेत विविध जबाबदाऱ्या पार पाडल्या. त्यानंतर पक्षाच्या विविध पदांवर काम करत त्यांनी संघटनात्मक अनुभव संपादन केला.

मनसेचे राज्य उपाध्यक्ष आणि सध्या सरचिटणीस म्हणून काम करताना त्यांनी नागपूर, वर्धा, अमरावती, धुळे, नंदुरबार, कोल्हापूर आणि लातूर जिल्ह्यांत संपर्क प्रमुख व निरीक्षक म्हणूनही जबाबदाऱ्या सांभाळल्या आहेत.

दरम्यान, त्यांच्या नियुक्तीमुळे बुलढाणा जिल्ह्यात मनसेच्या कार्याला अधिक गती मिळेल, असा विश्वास तालुकाध्यक्ष अमोल रिंढे पाटील यांनी व्यक्त केला. आगामी काळात पक्षाचा जनाधार वाढवणे, नवीन कार्यकर्त्यांना संधी देणे आणि स्थानिक प्रश्नांवर प्रभावी भूमिका मांडण्यावर भर राहणार असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच शेडगे यांचा लवकरच जिल्हा दौरा होणार असल्याची माहितीही त्यांनी दिली.

